**प्रेसनोट**

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**

**पुणे-४११००६**

**जा.क्र./पोउआ/वाह/ /२०२४** **पुणे दिनांक - १६/०२/२०२४**

पुणे शहरातील चतु:श्रृंगी वाहतुक विभागांतर्गत पुणे विद्यापीठ चौकामध्ये मेट्रो पिलरचे काम चालु आहे.सदर ठिकाणी वाहतूक कोंडीमध्ये वाढ होत असल्याने वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, यांनी चतु:श्रृंगी वाहतुक विभागातील रस्त्यांवर प्रायोगिक तत्वावर वाहतूक बदलाबाबतचे खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## चतु:श्रृंगी वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,

- पुणे विद्यापीठ चौकातील सावित्रीवाई फुले पुणे विद्यापीठ मुख्य प्रवेशद्वारामधुन विद्यापीठमध्ये जाण्यासाठी एस बी रोड व गणेशखिंड रोडने येणा-या वाहनांकरीता देण्यात आलेला राईट टर्न व यु टर्न बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** - चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन समोरील मिलेनियम गेटमधुन राईट टर्न घेवुन सावित्रीवाई फुले पुणे विद्यापीठमध्ये इच्छित स्थळी जावे.

- बाणेर व औंध रोडवरुन येणा-या वाहनांना सावित्रीवाई फुले पुणे विद्यापीठ मुख्य प्रवेशद्वारामधुन विद्यापीठमध्ये जाण्यासाठी प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – १. ओंधरोड वरुन येणा-या वाहनांनी सावित्रीवाई फुले विद्यापीठामध्ये जाण्यासाठी मिलेनियम गेटमधुन प्रवेश करावा.
२. बाणेर रोड वरील वाहनांनी सावित्रीवाई फुले पुणे विद्यापीठ चौकामधुन डावीकडे वळण घेवुन ओंध रोडवरील मिलेनियम गेटमधुन प्रवेश करावा.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे – ४११००६ यांचे कार्यालयात **दिनांक – १७/०२/२०२३ ते दिनांक – ०२/०३/२०२३** पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**(शशिकांत बोराटे)**

पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

**प्रति,**

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१

२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.